उत्कर्ष
नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वाई

विश्वासाचं खणखणीत नाणं

# उत्कर्ष नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वाई

● Reg No. : SAT/WAI/RSR/(CR)/1201/15-03-1999

प्रधान कार्यालय : ४४२, गणपती आळी, वाई. जिल्हा-सातारा. महाराष्ट्र : ४१२८०३

# २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

सर्व सभासदांना कळविणेत येते की, **संस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी २.३० वा. कृष्णोत्सव मंगल कार्यालय, मधली आळी, वाई येथे खालील विषयांचा विचार करणेकरीता घेण्यात येईल. तरी सभासदांनी वेळेवर आवश्य उपस्थित रहावे, ही विनंती**

## • सभेपुढील विषय •

१. दि. ३० स्पटेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

२. दि .३१ मार्च २०२२ अखेरच्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन करणे व स्वीकृत करणे.

३. वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे व स्वीकृत करणे.

४. कायदा व नियम यांस अनुसरून नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.

५. सन २०२२-२०२३ करिता तयार केलेल्या अंदाजपत्रकाची व गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे व जास्त झालेल्या खर्चास मान्यता घेणे.

६. मा.संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

७. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.

८. सन २०२१-२०२२ लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

९. शाखा विस्तार करणेबाबत.

१०. मुख्य कार्यालय व शाखा जागा/इमारत खरेदीबाबत.

११. सन २०२१-२०२२ करीता प्रशिक्षण, कर्ज, ठेव, गुंतवणूक व वसुली इ. तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.

१२. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

Sd/-
मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**श्री.प्रकाश मारुती पवार**
मुख्य व्यवस्थापक

स्थळ : **वाई**
दिनांक : **१०/०९/२०२२**

**विशेष सूचना**

१. सन २०२१-२०२२ चा अहवाल, ताळेबदं पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या वेबसाईट **www.utkarshlimited.com** व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासानंतर वरिल विषयांसाठी संस्थेच्या पोटनियम क्र. इ. ३५ (३) मधील तरतुदीनुसार घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

३. ज्या सभासदांनी वरील विषय पत्रिकेतील विषया संदर्भात प्रश्न किंवा माहिती विचारावयाची असेल त्यांनी तसे लेखीपत्र दि.२०/०९/२०२२ रोजी सायं. ५ वा. पर्यंत मुख्य कार्यालयास अथवा संस्थेच्या ई-मेल आयडी **utkarsh_wai@rediffmail.com** वा पाठवावे.

४. शासनाच्या नियमाप्रमाणे आपली के.वाय.सी. पुर्तता असल्यासच आपल्या लाभांशाची रक्कम आपल्या सेव्हिंग्ज ठेव खाती वर्ग केली जाईल. तीन वर्षापर्यंत लाभांश न घेतल्यास नियमाप्रमाणे लाभांश रक्कम राखीव निधीत जमा होते याची नोंद घ्यावी. सबब आपले सेव्हिंग्ज ठेव खाते नसल्यास संबंधित शाखेत खाते उघडावे व के.वाय.सी. ची पूर्तता करावी.

५. शेअर्स सर्टिफिकेट तयार झालेली आहेत. कृपया कार्यालयीन वेळेत संबंधित शाखांमधुन स्वत: येऊन घेऊन जावीत.